Vol 4 Issue 8 Feb 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# 21 व्या शतकातील मराठी भाषा

**प्रा.डॉ. आय. जे. तांबोळी**

**प्रमुख, मराठी विभाग , एस.एस.ए. आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.**

**सारांश :-**मातृभाषेला मानवी जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. मातृभाषा ही खरी अभिव्यक्तीची भाषा आहे. मराठी ही आपली मायबोली पण.... आपल्या देशात अनेकांनी आक्रमणे केली. त्यामुळे पारशी, कानडी, तेलगु, हिंदी, इंग्रजी भाषेतील शब्द मराठीत रुढ झाले. देशाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे पुर्ण झाली तरी त्यातील शब्दांना दूर करून परिपूर्ण मराठी होण्यासाठी हवे तेवढे प्रयत्न होताना दिसत नाही. उलट त्यांचा वापर केल्यानेच आपली मराठी भाषेचे मुळ रूप हरवून बसते की काय? अशी शंका मनात निर्माण होते. म्हणूनच मी '21 व्या शतकातील मराठी भाषा : आव्हाने व उपाय' हा शोधनिबंध सादर करत आहे.

### *प्रस्तावना :–*

मातृभाषा हे केवळ सामाजिक ऐक्याचेच नव्हे तर सांस्कृतिक ऐक्याचे देखील महत्त्वाचे साधन आहे. ही संस्कृती मातृभाषेच्या साहित्यातूनच निर्माण झालेली असते. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायामधील पहिल्या व तिसऱ्या चरणात ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेच्या गुणांचे वर्णन करताना, मराठी भाषेची थोरवी सांगतात–

''माझा मऱ्हाटाची बोलु कवतिके ।
परि अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळविन ।''

संत ज्ञानेश्वराप्रमाणे अनेक संतांनी, पंडीत, कवी, शाहीर यांनी मराठीचा अर्थ अभिमान व्यक्त केला. मराठी राज्य तंजावरपर्यंत असावे यासाठी धडपडणारे राजे छत्रपती शिवाजी महाराज, मुलांच्या मृत्युची वार्ता कळल्यावरही केसरीचा आग्रलेख लिहित बसलेले टिळक, आणि दुपारी मुलीचं निधन झालेले असता, रात्री नाट्याप्रयोग झालाच पाहिजे, असा आग्रह धरणारे बालगंधर्व, यशवंतराव चव्हाण, कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेचा आग्रह धरला. मराठीला ज्ञानभाषा, राज्यभाषेचा दर्जा दिला. यांचा महाराष्ट्र, कुठे ते आणि कुठे आजचे मराठी कार्यकर्ते?

### *मराठी भाषेपुढील आव्हाने :–*

आज 21 व्या शतकामध्ये मराठी भाषेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. आपले महाराष्ट्र सरकार भारतातील सर्व भाषिकांसाठी त्यांच्याच भाषेतून त्यांच्याच लिपितून एस.एस.सी., एस.एस.सी. परिक्षा घेते हे केवढे दुर्दैव? इतर कोणत्या राज्यात असे पहायला मिळते? मराठी भाषिकांसाठी देवनागरी लिपीतून किती प्रांत परिक्षा घेतात? दरवर्षी किती विद्यार्थी या परिक्षांना बसतात? याची दखल कोण घेतो? आज चीन, जपान, रशिया सारख्या देशात तेथील व्यवहारात इंग्रजी नसून त्यांच्या स्वभाषेचा आग्रह व स्वीकार विशेष महत्त्वाचा दिसतो. लांबचेच कशाला, आपल्याच महाराष्ट्राशेजारी असणारे गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक स्वतंत्र अशी स्वभाषा वापरताना दिसतात. मग महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरायला नको का?

महाराष्ट्रामध्ये आज कित्येक शाळामध्ये प्राथमिक शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून देण्याकडे प्रत्येकाचा कल वाढत चालला आहे. इंग्रजीचे आकर्षण आहे. परिणामी मराठी शिक्षण कोणासही नको आहे. अशा प्राथमिक शिक्षणाने मुलामुलात दुरावा निर्माण होऊन न्युनगंड निर्माण होत आहे. हेही मराठी भाषेपुढील आव्हानच आहे. त्यातच आज महाराष्ट्रामध्ये इंग्रजी शाळांना परवानग मिळते पण मराठी शाळांना मी मिळत नाही. ही खेदाची बाब आहे.

महात्मा गांधी म्हणतात, ''ज्याप्रमाणे बाळाला शारीरिक विकासासाठी मातेच्या दुधाची गरज असते, त्याचप्रमाणे मानसिक विकासासाठी मातृभाषेची गरज असते.'' म्हणूनच मातृभाषा श्रेष्ठ असते. पण आज मराठी भाषा अनेकांना कमीपणाची का वाटावी?

मराठी माध्यमाची वृत्तपत्रे शिवाय दूरदर्शनवर प्रसारीत होणारी गाणी, प्रसारीत होणारे कार्यक्रम हिंदी भाषेतच जास्त दिसतात. ई टीव्ही, स्टार प्रवाह, स्टार माझा, न्युज ही इंग्रजी नावे या प्रसार माध्यमातून येताना दिसतात. मराठी साहिन्या असूनही येथे इंग्रजी किंवा हिंदी भाषेचा वापर होताना दिसतो हे मराठी भाषेपुढे असणारे आव्हानच आहे.

वृत्तपत्रात संपादकीय लेखामध्ये किंवा शिर्षकामध्ये इंग्रजीचा वापर होताना दिसतो. उदा. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, संचार, लोकमत इ.

दूरदर्शनवरील विविध भाषिक, राजकीय नेत्यांच्या व इतर व्यक्तीच्या मुलाखती घेण्यासाठी हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर केला जातो. मराठीमध्ये एखादा दर्जेदार कार्यक्रम, एखादी दर्जेदार मालिका होवू शकत नाही.

''इतकी वर्षे गेली महाराष्ट्र अस्तित्व आले, पण मराठी भाषेला स्वाभिमानपूर्वक महाराष्ट्राच्या दरबारात स्थान प्राप्त झाले नाही.'' अशी खंत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीवर्य कुसुमाग्रज यांनी व्यक्त केलेली आहे. महाराष्ट्र टाईम्स्ने 2004 मध्ये एक सर्वेक्षण अहवाल सादर केला होता. त्यामध्ये मराठीच्या शाळामधून दोन हजार तुकड्या रद्द करण्यात आल्या अशी नोंद होती. ही मराठी भाषेची पिछेहाट आपल्याला अस्वस्थ करीत नाही काय? अशीच परिस्थिती राहिली तर यशवंतराव चव्हाणांनी म्हटल्याप्रमाणे— ''लोकभाषा आणि ज्ञानभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन सार्थ होत नाही उन्नत होत नाही, विकसित होत नाही असे माझे स्वतःचे खंबीर मत आहे.'' असे कै. यशवंतराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून जरी कोणी मराठी भाषेकडे पाहत असेल ते अत्यंत चुकीचे आहे. जेवढ्या गंभीरपणे या भाषेचा अभ्यास व्हायला हवा तितका होताना दिसत नाही. ही आव्हाने फक्त मराठी भाषेसमोरील नाही तर ती मराठी संस्कृती, मराठी माणसं, मराठी अस्मिता, मराठी, अध्यापक व विद्यार्थ्यांसमोर आहेत.

आज भौतिकशास्त्र, तंत्रविज्ञान, वैद्यकिय शास्त्र अशा विविध क्षेत्रातील ज्ञान आपल्या भाषेतून मिळवणे क्रमप्राप्त आहे. हे ज्ञान न मिळविणे म्हणजे अडचण निर्माण होईल. हे ज्ञान नसल्यामुळे किंवा ते इतर भाषेत असून मराठीमध्ये नसल्यामुळेच की काय आज मराठी भाषिक मराठी संशोधन क्षेत्रात मागे पडत आहेत.

लेखक कथा, कादंबरी, नाटकांची नावे, इंग्रजी देताना दिसतात. उदा.— ऑल दी बेस्ट.

***मराठी भाषा संवर्धाचे उपाय :—***

***मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनेक उपाय केले पाहिजेत म्हणूनच—***

प्रा. भ. द. हातकणंगलेकर म्हणतात, ''मराठी भाषा वाचविण्यासाठी रोजच्या व्यवहारात सक्ती केली पाहिजे. आणि त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून झाली पाहिजे.''

कै. यशवंतराव चव्हाण म्हणतात, ''लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे.''

1) परकिय भाषेची घुसखोरी थांबविणे आवश्यक आहे. मराठी भाषेचा आग्रह सर्वत्र धरावा. इंग्रजी माध्यम असलेल्या शाळामधूनही मराठी भाषा सक्तीची करावी.

2) मराठीचे आकलन होण्यासाठी, व्याकरण, लोकसाहित्य, लेखन कौशल्यासाठी, संवादलेखन, मुलाखत लेखन किंवा कवितेचे रसग्रहण इ. बाबींचा समावेश करावा. शिवाय विद्यापीठीय स्तरावर अभ्यासपत्रिकेमध्ये तोंडी परिक्षेला गुण ठेवावेत. त्यामुळे बोलणे भाषण या भाषिक कौशल्याचा विकास होईल. त्याबरोबरच शब्दकोश, विश्वकोशाचा वापर करावा.

3) सर्व शासकीय, निमशासकीय, कार्यालये, शाळा, महाविद्यालये विद्यापीठे, न्यायालये, कारखाने इत्यादी मधून होणारा भाषिक व्यवहार मराठीमध्ये व्हावेत. आजही जिल्हा परिषदेमध्ये जातीचे किंवा इतरही काही प्रमाणपत्रे आपल्याला इंग्रजीत मिळतात. ते मराठी मिळावेत. मराठी माणसाने परप्रांतीय, व्यापारी, धंदेवाले, नोकरीत ज्या—ज्या व्यक्ती आहेत त्यांच्याशी मराठीतच व्यवहार करावा.

4) अनुवादीत, भाषांतरीत मराठी साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे. तसेच त्याचबरोबर प्रसारमाध्यमे, संदेशवहन, ई—मेल, संगणक यासारख्या विकसित होत जाणाऱ्या इलेक्ट्रानिक साधनांचे ज्ञान मराठी भाषेतून कशाप्रकारे मिळेल यासाठी मराठी माणसाने, संशोधकांनी, प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत.

5) मराठीचे उत्तम ज्ञान असेल तर बड्या पगाराची नोकरी मिळायला अडचण येणार नाही. अशी हमी मिळाली तर पालक निश्चित मराठी शाळाकडे आकर्षित होतील.

6) विद्यापीठीय स्तरावर बी.सी.ए., एम.सी.ए. सारख्या अनेक इंग्रजी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी एखादा मराठी विषय सक्तीचा किंवा हा अभ्यासक्रम मराठीमध्ये आणण्यासाठी तज्ज्ञांनी अध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत. जेणेकरून यातूनही मराठी माणसांना, तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

7) इतर कोणत्याही भाषेबद्दल माझा आक्षेप नाही. आपल्याला जितक्या भाषा आत्मसात करता येतील एवढे महत्त्वाचे आहे.

8) विद्यापीठीय स्तरावर मराठी भाषेचा वापर करून त्यांना व्यवसायाभिमुख शिक्ष देण्याचा प्रयत्न करावा.

9) मराठी भाषा ही केवळ पोट भरण्याचा विचार नाही तर एकसंघ समाज उभारण्याचाही तो विचार आहे.

***निष्कर्ष :—***

राज्यात दळणवळणाची साधने, शिक्षण, व्यापार, उद्योगधंदे वाढल्याने न कळत याचा परिणाम येथील भाषेवर झालेला दिसून येतो.

बोलीभाषेतही अनेक इंग्रजी शब्द येताना दिसतात. मराठी बोलता—बोलता इंग्रजी, हिंदी सारख्या परकीय भाषेचा जाणूनबुजून वापर करून लय घालवण्याचा खोटा आव आणताना दिसतात.

मुंबई, पुण्यासारख्या किंवा सिमावर्ती भागात बोलीतील शब्दोच्चारावर देशपरत्वे परिणाम झालेला दिसतो.

***संदर्भग्रंथ :—***

1.शतकांची विचारशैली— डॉ. रमेश धोंगडे. अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनातील अध्यक्षीय भाषणे व त्यांची चिकित्सा, खंड— 1,2,3.
2.सह्याद्रीचे वारे— निवडक भाषणसंग्रह— यशवंतराव चव्हाण.
3.मराठी भाषा उपेक्षा आणि अपेक्षा— डॉ. दत्ता पवार.
4.साहित्य आणि समाज— प्रो. गो. भा. पवार.
5.चौथे समरसता साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण— प्रा.श्री. अनंत तोरो.
6.स्मरणिका— 76 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कराड.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org